# पाक्षिक परिभ्रमण

संपादक - एस. एस. गायकवाड

RNI No. MAHMAR/2006/18557

वर्ष १९ अंक २० रविवार दि. १३ ऑक्टोबर २०१९ पाने ४

# मिलिंद चंद्रकांत बेळमकर कार्य कर्तबदार मिलिंद बेळमकर यांचे जनतेला आवाहन

मी मिलिंद चंद्रकांत बेळमकर गेली २५ वर्षे कल्याण शहराच्या विकास आणि आंबेडकरी समाजाच्या ऐक्याची चळवळ प्रखर करण्यासाठी नेहमीच अग्रेसर राहिलेले आहेत. कल्याण शहरात राहणाऱ्या सर्व जात - धर्म - पंथ - प्रांत - भाषा यांची अस्मिता घेऊन जगणाऱ्या लोकांना एकत्र करण्याचे आणि त्यांना न्याय देण्याचे निरपेक्ष काम बेळमकर गेली अनेक वर्षे विविध माध्यमांतून करीत आहेत.

२०१९च्या राज्यविधानसभा निवडणुकीत १४२ - कल्याण (पूर्व) विधानसभा मतदार संघातून बहुजन समाज पार्टीचा अधिकृत उमेदवार म्हणून बेळमकर यांनी जाहीर आवाहन केले आहे की, या मतदार संघातील जनतेची सेवा करण्याची आणि या मतदार संघाचा सर्वांगीण विकास करण्याची संधी मला द्यावी, असे आवाहन त्यांनी एका पत्रकाद्वारे केले आहे. या पत्रकात ते लिहीतात मी गेल्या २५ वर्षांपासून निस्वार्थीपणे आणि स्वाभिमानाने सातत्याने सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक कार्य करीत आहे आणि सर्व जनतेचे सामाजिक प्रश्न सोडविण्याचा मी प्रामाणिकपणे प्रयत्न करीत आलेलो आहे.

''कल्याण (पूर्व) चा विकास हाच माझा ध्यास'' ह्या भूमिकेतून सर्व जाती - धर्माच्या नागरिकांना भारतीय संविधानाने दिलेले हक्क अधिकार प्रदान करणे, या हक्क - अधिकारांचे संरक्षण करणे हे माझे परम कर्तव्य समजतो. मतदार राजाला केंद्रबिंदू मानून आपले सर्व जगण्या - मरणाचे प्रश्न - समस्या कायमस्वरुपी सोडवून १४२-कल्याण (पूर्व) विधानसभा मतदारसंघाचा पर्यावरण केंद्रीत, शाश्वत आणि समृद्ध आदर्शवत विकास करण्याचा दृढनिश्चयाने, आत्मविश्वासने, मी ठाम भूमिकेने उभा राहत आहे.

१४२-कल्याण (पूर्व) विधानसभा मतदारसंघाच्या नागरी सुख सुविधा आणि सर्वांगीण विकास करण्यासाठी आपण आपले अमूल्य मत हत्ती या निशाणीवर देऊन माझ्यासारख्या राजकीय - सामाजिक ज्ञान असलेल्या आपल्या निःस्वाथी स्वाभिमानी आपल्या हक्काच्या माणसाला आपले अमूल्य मत देऊन आपली सेवा करण्याची मला संधी द्यावी आणि नव्याय विकासाच्या बदलाचे आपण सर्वजण साक्षीदार व्हावे, असे आवाहन मिलिंद बेळमकर यांनी केले आहे.

## कल्याण (पूर्व)ची दुरावस्था कुणामुळे?

मागील दहा वर्षांपासून कल्याण पूर्वची विकास पाहता जैसे थे... त्यापेक्षाही अधिक वाईट परिस्थिती झाली आहे. १० वर्षांपूर्वी कल्याण पूर्वची लोकसंख्येच्या दुप्पटीने वाढून सुद्धा नागरी सुख - सुविधा जशा आहेत तशात आहेत. त्यामध्ये कसल्याही प्रकारची वाढ झालेली नाही. कोणत्याही लोकप्रतिनिधींने किंवा पक्षाने त्यासाठी प्रयत्नही केला नाही, दिलेली आश्वासने पूर्ण केलेली नाहीत, स्मार्टसिटीची आश्वासने फोल ठरली. मागील दहा वर्षांपासून फक्त सांस्कृतिक कार्यक्रम राबविणे, धार्मिक कार्यात सहभाग होणे, कार्यकर्त्यांना फिरण्यासाठी मोफत बसची व्यवस्था करणे. जॉबकार्ड देवून बेरोजगारांची फसवणूक करणे. पुरामध्ये फसलेल्या लोकंना वडा-पाव वाटतांनाचे सेल्फी काढून स्वतःची जाहिरात करणे. निधीचा वापर नको तेथे करुन आपल्याच कंत्राटदारांना टक्केवारीवर काम देणे. लहान - मोठ्या बिल्डरकडून टक्केवारीवरुन, अनधिकृत बांधकामावरुन त्यांना दबावात ठेवणे. जातीयय धार्मिक दंगली घडल्यानंतर सामाजिक एकोपा न करता विशिष्ट वर्गाला भडकविण्याचे काम करणे. हेच या कल्याण पूर्वमधील लोकप्रतिनिधींने केले आहे. विविध राज्यातून आलेल्या अमराठी लोकांना त्यांच्या धार्मिक कामांसाठी आमिष दाखवून निधी उपलब्ध करुन देणे. हेच कारण कल्याण पूर्वच्या दुरावस्थासाठी आहे.

**लोकप्रतिनिधीची वैचारिक पातळीच त्या दर्जाची असेल तर कल्याण पूर्वेचा विकास होईल तरी कसा?**

### आणि हाच बदल आता आपल्याला घडवायचा आहे.

२०१९ विधानसभा निवडणुकीमध्ये पक्ष बघू नका, तर माणूस, व्यक्ति बघून मतदान करा.

तुमच्या सद्बुद्धीला पटेल असे मतदान करुन कल्याण पूर्वचा विकास करण्याची संधी मिलिंद चंद्रकांत बेळमकर यांना द्यावी ही विनंती.